# स्वयंपाकघराच्या रचनेमागील वास्तुशास्त्र

प्रत्येक घरात काही ना काही वास्तुदोष असतात. त्याचे वेळीच निराकरण न केल्यास त्यांचा मानवी जीवनावर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. घराची उन्नती,सुख,शांती आणि कुटूंबियांचे एकमेकामधील सौहार्दपूर्ण संबंध या बाबी वास्तुशास्त्राच्या माध्यमातून साधउय होऊ शकतात. मात्र वास्तुशास्त्राच्या उपाययोजनेच्या माध्यमातून वास्तुदोषांचे निराकरण करायला हवे.



वास्तुशास्त्र .या विषयाला गेल्या दहा-बारा वर्षात महत्व प्राप्त झाले आहे. भारतीय शास्त्रांच्या वैशिष्टया नुसार वास्तुशास्त्र देखील निसग नियमावरच आधारित आहे. निसर्गाशी एकरून होऊन त्यातील नैसर्गिक ऊर्जेचा मानवाच्या विकासासाठी उपयोग करून घेणे हे या शास्त्राचे एकमेव उद्धिष्ट असते. वास्तुशास्त्राचे नियम पाळून पास्तुरचना केल्यास त्या वास्तुमध्ये वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींना शुभफळे प्राप्त होतात. वास्तुशास्त्रात घरातील प्रत्येक विभागाच्या रचनेचा विचार केलेला आढळतो. वास्तुशास्त्रीय दृष्टीकोणातून घराची रचना करतांना स्वयंपाकघर आग्नेय दिशेमध्ये असणे अत्यावश्यक आहे.तर मुख्य शयनगृह नैऋत्य मध्ये आणे आवश्यक आहे.स्वयंपाकघर हे महिलांचे मुख्य कार्यक्षेत्र असते. त्यामुळे तेथील रचना व वातावरण निर्मीती ही त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला पोषक होईल अशा प्रकारची होणे आवश्यक असते. शास्त्रीय दृष्टीकोणातून विचार केल्यास सूर्यकिरणांमधील तांम्र किरणे ही ४५ अंशातून स्वयंपाकघरातून येतात त्यावेळी ती त्यांचे निर्जंतूकिकरण करण्यात व तेथे तयार होणाऱ्या अन्न पदार्थांची जैविक मूल्य कायम राखण्यात फार मोठी भूमिका पार पाडतात. त्यामुळे सकाळच्या वेळी जास्तीत जास्त सूर्यकिरणे घरात येतील अशी रचना करणे लाभदायी ठरते. स्वयंपाकघराच्या पूर्वेच्या बाजूने खिडकी असावी व गॅस शेगडीची मांडणी अशा पध्दतीने करावीं जेणेकरून स्वयंपाक करणाऱ्या महिलेचे तोंड पूर्व दिशेकडे होईल सकाळच्या सूर्यकिरणांमुळे स्वयंपाकघराचे हायजेनिक संतुलन योग्यपणे स्थापित होते. तसेच स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठीसुध्दा सकाळची किरणे लाभदायी ठरतात. याशिवाय याचा आणखी महत्वपूर्ण फायदा म्हणजे पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणारा वारा, स्वयेपाकघरातील दूषित वातावरण पूर्वेकडील खिडकीतून बाहेर घेऊन जातो. व किचनमधील वातावरण प्रसन्न व सुखदायी होते.

एखादी व्यक्ती एकाच ठिकाणी खूप काळासाठी काम करते तेव्हा तेथील वातावरण अशा प्रकारे निर्माण केल्यास तिची कार्यक्षमता वाढते व तिचे शारीरिक, मानसिक संतुलन चांगले राहते. वैद्यकीय शास्त्रानूसार मानवी शरीरातील यकृत (लिव्हर) ठीक तर प्रकृती ठीक त्याचप्रमाणे घरात किचन योग्य जागी म्हणजे. अग्नेय दिशेत असेल तर त्या घरातील गृहीणी सक्षम व प्रसन्न व सुखी असते. आजपर्यंत फ्लॅट सस्कृतीत. घराची रचना वास्तुशास्त्रानुसार करण्यात बांधकाम व्यावसायिक दुर्लक्ष करत होते. परंत प्रत्येक फ्लॅट ७० ते ८० टक्के वास्तुशास्त्रानुसार बांधता येऊ शकतो. अगदी आर्किटेक्चर व शासकिय नियमावलीचा पूर्णपणे अंगाकारे करूनसुध्दा हे शक्य आहे. आजकाल ग्राहकांच्या वाढत्यां मागणीमुळे वास्तुशास्त्रीय दृष्टीकोनातून घर बांधणीला सुरूवात झालेली आहे.

## स्वयंपाकघरातील स्थानदोषांचे निराकरण

स्वयेपाकघर अग्नेय दिशेमध्ये नसेल तर वास्तुदोष निर्माण होतो व परिणामी प्रगतीमध्ये अडथळे येण्यास सुरूवात होते. स्त्रीच्या आरोग्यावर परिनाम दिसू लागतात. आग्नेय दिशेसोबत ईशान्य दिशेमध्येसुध्दा वास्तुदोष असल्यास . स्त्रियांचे आरोग्य ढासळते व घरातील प्रमुख स्त्री जायबंदी झांली तर त्या घरामध्ये किती समस्या निर्माण होतील हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आग्नेय दिशेऐवजी किचन नैऋत्य (दक्षिण-पश्चिम) दिशेमध्ये असले तर आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. तयार केलेले अन्न वाया जाणे, किचनमध्ये काम करतांना प्रसन्नता नसणे असे प्रकार घडतात. हे किचन वायव्य


**मंजुश्री अहिरराव**

मो. ०९८६९००१७१९


(उत्तर- पश्चिम) दिशेत असल्यास त्या घरात सतत कटकटी होण्याचे प्रमाण वाढतात. तसेच कुटूंबियांना जवळच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या रोषाला, मत्सराला, विश्वासघाताला सामोरे जावे लागते. किचन ईशान्य (उत्तर-पूर्व) दिशेत असल्यास घरातील सदस्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी वाढतात. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर तसेच आर्थिक परिस्थितीवरही वाईट परिणाम होतो. फ्लॅटमध्ये तोड- फोड करणे शक्य नसते मात्र, वास्तुशास्त्र तज्ञांकडून तोड-फोड केल्याशिवाश उपाययोजना केल्यास वास्तुदोषांचे निराकरण होऊन ती वास्तु फलदायी होते. प्रत्येक घरात काही ना काही वास्तुदोष असतात आणि त्याचे मानवी जीवनावर दुष्परिनाम होत असतात. त्यामुळे वास्तुशास्त्र उपाययोजनेच्या माध्यमातून त्या वास्तुदोषांचे निराकरण करणे अत्यावश्यक असते. अलीकडे वास्तुशास्त्राचे महत्व लक्षात आल्याने बऱ्याच घरांमधील स्वयंपाकघर, शयनकक्ष, दीवानखाना, देवघर, अभ्यासिका , यांच्यां रचनेमागे वास्तुशास्त्राचा वापर केलेला दिसतो.

नवीन घेतलेल्या वास्तुमध्येसुध्दा गृहप्रवेश, आंतर्भागातील सजावट तसेच नवीन वास्तुची पार्टी इत्यादी सोपस्कार करतांना वास्तुशास्त्र उपाययोजना करणे आत्यावश्यक असते. यामुळे नवे घर दोषमुक्त होते. घराची उन्नती, घरातील सदस्यांची प्रगती, सुखशांती, समृध्दी, आरोग्य आणि एकमेकामधील सौहार्दपूर्ण संबंध हे वास्तुशास्त्राच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त होत असते. या सर्व गोष्टी प्राप्त होण्यासाठी घराची गृहस्वामीनी सक्षम आणि सुदृढ असणे हे देखील आवश्यक असते. त्यासठीच तुमच्या घराचे किचन अग्नेय दिशेमध्ये असणे आणि तुमच्या घरातील ईशान्य दिशा दोषमुक्त असणे अत्यंत आवश्यक आहे.